जा.क्रं.नांवाशमनपा/आस्था-सेल/9711/2015
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक:- 27.10.2015

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड**

**विशेष कार्य अधिकारी (OSD) मानधनावर नियुक्ती बाबत.**

जाहिर सुचना

नांदेड शहराचा वाढता विकास आणि वाहतूकीची वारंवार होणारी कोंडी सोडविण्यासाठी ATAL MISSION FOR REJUVENATION AND URBAN TRANSFORMATION (AMRUT) योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची स्वतंत्र वाहतूक यंत्रणा असावी यासाठी तयारी करणेकरिता प्रकल्प/योजनेचा अराखडा,अहवाल तयार करणे व त्यासाठी कागदपत्राची पुर्तता करणे इत्यादी कामासाठी एक अनुभवी व्यक्तीची विशेष कार्य अधिकारी (OSD) म्हणुन नियुक्ती करावयाची आहे. सदरचे पद करार पध्दतीने एकत्रीत वेतनावर अकरा महिण्यांकरिता भरावयाचे आहे.

सदर पदासाठी परिवहन सेवतून/महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेतून निवृत्त झालेला परिवहन व्यवस्थापक किंवा तत्सम दर्जाचा (सेवानिवृत्त) व संबंधीत कामाचा विशेष अनुभव असलेल्या पात्र व ईच्छूक सेवानिवृत अधिका-यांकडून खालील वेळापत्रकानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

| वेळापत्रक | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचा दिनांक/वेळ (टिप:- अर्ज पोस्टाने अथवा कुरीअरने स्विकारले जाणार नाहीत) | दिनांक 28.10.2015 ते दिनांक 03.11.2015 पर्यंत (कार्यालयीन वेळेत) |
| अर्ज स्विकारण्याचे स्थळ | स्थळ - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड मुख्य प्रशासकीय ईमारत, प्रशिक्षण हॉल 3 रा माळा, श्री गुरुगोंविदसिंघजी शासकीय रुग्णालया-समोर, वजीराबाद, नांदेड. |

| पदाचे नांव | पदसंख्या | एकत्रीत वेतन/पारिश्रमीक |
|---|---|---|
| विशेष कार्य अधिकारी (OSD) | 01 | एकत्रीत वेतन रु. 10,000/- |

इतर अटी व शर्ती -

1. सदरची नियुक्ती ही करार पध्दतीने व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असेल.
2. सेवानिवृत्त अधिका-याचे जाहिरातीच्या तारखेस 70 वर्षापेक्षा कमी असावे.
3. सेवानिवृत्त अधिकारी हा शाररिक मानसिक आरोग्य दृष्टीने सक्षम असावा.
4. प्राप्त अर्जाच्या छाननी नंतर पात्र उमेदवार ठरवून नेमणूकीचा कार्यक्रम ठरविण्यात येईल.
5. सदर नियुक्तीचा कालावधी 11 महिन्यांचा राहील.
6. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-याच्या नियुक्तीच्या इतर अटी,शर्ती व पारिश्रमीक वेतन हे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.15. फेब्रुवारी 1995 मधील तरतुदी नुसार राहील.
7. महानगरपालिकेने नेमुन दिलेले काम विहित मुदतीत पुर्ण करण्याची जबाबदारी सदरच्या अधिका-याची राहिल या बाबत बंधपत्र करुन द्यावे लागेल.
8. नेमुन दिलेले काम पुर्ण झाल्या बाबात संबंधीत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र घेतल्या नंतरच शेवटच्या दोन महिन्याचे पारिश्रमीक देण्यात येईल.
9. सदरची जाहिरात, अटि व शर्ती महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड व www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.)**

28/10/15

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
करिता-